# निवडणूक राजकारणाच्या चक्रव्यूहात अडकलेले आरक्षण धोरण.

**राहुल नरंगलकर**,
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र,
अण्णासाहेबमगर महाविद्यालय,हडपसर,पुणे.

भारतीय संविधानाने वंचित, शोषित, बहिष्कृत आणि मागासलेल्या जाती-जमाती समूहांना विशेष संधी मिळवून देण्याचे अंगीकारलेले मूल्य ब्रिटिश राजवटीने या देशात १८५८ पासून टप्याटप्याने सुरु केलेल्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतून आकाराला आले. या देशात एका बाजूस लोकशाहीची प्रक्रिया हळूवारपणे गतिमान करीत असतानाच दुसऱ्या बाजूस इथले लोक आहेत तरी कसे आणि किती? हे जाणून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न ब्रिटिशांनी केला. इथला प्राचीन इतिहास, येथील धर्म, वर्ण,जाती धारित श्रेणीबद्ध समाजरचना, इथल्या भाषा, रीतीरिवाज,अंधश्रद्धा,सण,उत्सव, निरक्षर व दरिद्री लोकांच्या समजुती, येथील शेती व शेतकरी, कला, साहित्य, आणि विज्ञान या क्षेत्रातील कामगिरी या विषयीची तपशीलवार माहित मिळवून जतन करण्याच्या कार्यात इंग्रज सैन्याधिकारी,आयसीएस प्रशासक आणि ख्रिस्ती धर्म प्रसारक मिशनरी यांनी अथक परिश्रम केले आणि त्याआधारे आपली साम्राज्यसत्ता दृढमूल केली.[१] परिश्रमाने गोळा केलेल्या या माहितीचा उपयोग इंग्रजांना मुळातच विभक्त असलेल्या आणि परस्परांविषयी पराकोटीची द्वेषमूलक वृत्ती धारण करणाऱ्या जाती समुहाना एकमेकांविरुद्ध झुंझवत ठेवण्यासाठी करता आला. फोडाआणिझोडा नीतीच्या अवलंबाद्वारे आपले साम्राज्य दृढमूल करून ते दीर्घकाळ टिकवून ठेवता आले.याकामी ब्रिटिशांना आंग्लविद्या सर्वात आधी आत्मसात करून आपले कारभारीपण कायम राखलेल्या, शोषणाची नवी व अधिक प्रभावी साधने हस्तगत करून बहुजनाच्या पिळवणूकीत वाटेकरी बनलेल्या आणि शासन व प्रशासनातील पदांवर कब्जा केलेल्या उच्चवर्णीय ब्राम्हण जातींचे साहय मिळाले.[२] ब्रिटिशांच्या फोडा, झोडाआणि राज्य करा या नीतीचेच प्रतिबिंब आज त्यांना राजकीय सत्तेवर प्रभुत्व प्रस्थापित केलेल्या उच्च जातीय धुरिणांच्या आरक्षण विषयक धोरणात उमटताना दिसते. संविधानातील तरतुदींच्या अनुषंगाने मागासलेल्या जातींना उपलब्ध झालेल्या विशेष संधी आणि सवलतींच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेले धोरणात्मक निर्णय या धुरिणांना नाईलाजाने घ्यावे लागत असलेतरी ते या धोरणाच्या अमलबजावणीत मात्र प्रामाणिक असल्याचे दिसून येत नाही. संविधानातील आरक्षण विषयक मुळ तरतुदींमध्ये आजच्या वर्तमान कालखंडापर्यंत ज्या अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या त्यामागे अनेक कारणे असलीतरी निवडणूक राजकारणातील डावपेच देखील महत्वाचे व मुख्य कारण राहिले आहे.

वर्ण आणि श्रेणीबध्द जाती व्यवस्थाएका बाजूला बहुजन जातींना विद्या, सत्ता, संपती आणि प्रतिष्ठा यापासून वंचित ठेवते तर दुसऱ्या बाजूस ती उच्च वर्णीय ब्राम्हण व व्यापारी जातींना बहुजनावर आपले वर्चस्व गाजवण्याची संधी देते. या संधी मुळेच ब्राम्हणांना ब्रिटीशांच्या 'लोकांना शासन आणि प्रशासनात सामावून घेण्याच्याधोरणाचा' कल्पकपणे वापर करून ब्रिटिश खात्यात आपली मक्तेदारी निर्माण करता आली. हे वास्तवसर्वप्रथम महात्मा जोतीराव फुलेंनी ओळखले. उच्चवर्णीय सुधारक कौटुंबिक सुधारणेवर भर देत असताना जोतीराव फुलें मात्र स्त्रीशूद्रातिशूद्र, शेतकरी आणि कामगार या सर्व शोषितांना आत्मोद्धारासाठी संघटीत होण्याची प्रेरणा देत होते.समग्र सामाजिक सुधारणांचा आग्रह धरत होते. वंचितांची कड घेऊन त्यांना विद्या आणि वित मिळविण्याची विशेष संधी द्यावी असा आग्रह करीत होते.[3] "सत्ता तुझी राणीबाई । हिंदुस्थानी जागृत नाही । जिकडे तिकडे ब्राम्हणशाही ।डोळे उघडून पाही ।चहुकडे भटशाही । कुणब्याची दाद नाही ।"[४] असे महाराणी व्हिक्टोरियाला उद्देशून लिहलेल्या अखंडाद्वारे जोतीराव फुले एकाबाजूस ब्राम्हणांची सार्वजनिक खात्यात निर्माण झालेले मक्तेदारी उघड करतानाच दुसऱ्या बाजूस बहुजनांची असाहयता अधोरेखित करतात. त्यावरील उपाय सुचवितानाते शिक्षण आणि सरकारी खात्यातील नोकऱ्यामध्ये प्रत्येक जातीला समान संधीची आणि संखेच्या प्रमाणात सर्व जातींना प्रतिनिधित्वाचीमागणी करतात. अनुभव स्वतां लक्षून । सांगतो खरे निक्षून । सर्व जाती निवडून । घ्याव्या संख्याप्रमाण ।द्यावी कामे नेमून । होईल सुख साधन । घालितो पदरी चुकीस । नेमिता एका जातीस । प्रवेश नाही शूद्रांस । एका जातीचे सर्व मिळून नाडिती । बाकीचे तोंडाकडे पाहती ।जोतीराव बोधी करू नये एक जात भरती

Copyright © 2020 Authors

।भरती होळकरी पोती[५] जात जातीच्या संख्याप्रमाण कामेंनेंमा ती । खरी ही न्यायाची रीती । नेंमा गुरु अन्य जातीचे । नमुने सात्विक ज्ञानाचे । निव्वळ माळ्यां कुणब्याचे । दुसरे महार मांगांचे । अशी महात्मा जोतीराव फुलेंनी १८६९ साली केलेली ही मागणी[६] आरक्षणनीतीची पायाभरणी करणारी तसेच ती शासन व समाजाला सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टाकडे घेऊन जाणारी होती.

विद्येच्या क्षेत्रात आघडीवर असलेल्या मुठभर लोकांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी बहुजनातील मागासलेल्यांना उच्च शिक्षण घेण्याची आणि ती पूर्ण केल्यानंतर अधिकारपदे भूषविण्याची संधी देणे गरजेचे असते. हे सयाजीराव गायकवाड आणि शाहू छत्रपती या दोघा राजांनी ओळखले होते. २६ जुलै १९०२ रोजी शाहू छत्रपतीनी एक अधिसूचना निर्गमित करून आपल्या संस्थांनातील सरकारी नोकऱ्यात ५०% जागा ब्राम्हणेत्तरांसाठी आरक्षित ठेवण्याचा जो निर्णयघेतला.[७] तो जोतीराव फुलेंच्या उपरोक्त भूमिकेचा परिपाक होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व बहिष्कृत जातींच्या उन्नतीसाठी साऊथबरो कमिशन समोर सादर केलेल्या निवेदनात सर्व बहिष्कृत जातीचे पाच गटात विभाजन करून त्यांना त्यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात प्रतिनिधित्व आणि विशेष सोयी सवलती देण्याची केलेली मागणी [८] तसेच आपल्या 'स्टेटअँड मायनॉरीटिज' या ग्रंथात अनुसूचित जातींच्या संविधानातील संरक्षक तरतुदींचा अन्वयार्थ स्पष्ट करताना कोणत्याही एका अल्पसंख्याक जाती समूहास विधिमंडळ अथवा प्रशासनातील प्रतिनिधित्वासाठी आपल्या संख्येपेक्षा अधिकांश लाभाचा दावा करता येणार नाही. सर्व जाती समूहास समान किंवा सामाजिक,आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीनुसार विशेष लाभाची व्यवस्था उचित ठरेल.[९] असे केलेले विवेचनजोतीराव फुलेंच्या वरील भूमिकेला बळकठी देणारे आणि आरक्षणाच्या परिघाबाहेर असलेल्या किंवा आरक्षणाच्या परिघात समाविष्ट असूनही आरक्षणाच्या लाभापासून वंचित असलेल्या जातींच्या मागण्यांना तात्विक आणि आत्मिक बळ मिळवून देणारे ठरले आहे. म्हणून महात्मा फुले, शाहू छत्रपती, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड हेआरक्षणनीतीच्या जडणघडणीत मैलाचा दगड (Milestone)आणि आरक्षण नीतीचे शिल्पकार ठरतात. आज 'सामाजिक न्यायासाठी आरक्षणनीती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या धोरणापुढे कांही महत्वाचे गंभीर आणि जटीलप्रश्न उभे राहिले आहेत. एक या धोरणाच्या रास्त लाभापासून अजूनही कोसो दूर असलेल्यावंचित आणि मागास राहिलेल्यांपर्यंत हे लाभ नेऊन पोहचविण्यासाठी आरक्षणाच्या धोरणात त्याचे फायदे गरजूंना मिळतील याद्दष्टीने सुधारणा करणे.[१०] दुसरे खोट्या लाभधारकांना आरक्षणाच्या परिघापासून दूर ठेवणे. तिसरे खोटे मुखवटे धारण करून आत घुसलेल्यांना बाहेर काढणे किंवा घुसू पाहणाऱ्यांना रोखणे आणि चार शिक्षण आणि आरक्षणाच्या जास्तीत जास्त फायद्यांवर मक्तेदारी गाजवत असलेल्या आणि आरक्षणाचे लाभ घेऊन गब्बर झालेल्यांना त्यांतून हळूहळू टप्याटप्याने कसे बाहेर काढता येईल याचे निश्चित धोरण ठरविणे जिकरीचे बनले आहे;कारण आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर आरक्षणाचा परीघ भेदू पाहणाऱ्या आणि आरक्षणनीतीच गैरलागू ठरवू इच्छीणाऱ्या इथल्या वर्ण व जाती उतरंडीवर आधारलेल्या जाती समूहावर अधिराज्य गाजवणाऱ्या ब्राम्हण्यग्रस्तांचा तो मुख्य अजेंडा आहे. त्यासाठीच ते मागासलेल्या समूहानच हाताशी धरून त्यांच्यात झुंझी लावण्याचे षड्यंत्र यशस्वी करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत.

मंडल कमिशनच्या शिफारशींपासून ढिसाळ पद्धतीने मागासलेल्या गटात (संवर्गात) कांही जातींचा समावेश करण्याची नीती गतिशील होत गेल्याने अनेक राज्यातील मध्यम स्तरावरील उच्च वर्णीय जातींमध्ये आणि उच्च वर्णीयातील गरिबांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास समजून आपलीही मागासवर्गीयांच्या गटात वर्णी लागावी अशी भावना तीव्र होत आहे. या भावनेला मतपेटीवर डोळा ठेऊन राजकारण करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी आपापल्यापरीने खतपाणी घालण्याचे काम केले आहे / करीत आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या लाभापासून खऱ्या अर्थाने वंचित असलेल्यांच्या मागण्यांकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे / होत आहे.

ब्रिटीश कालखंडात ब्राम्हणेत्तरांतील कांहीना मागासलेले ठरवून दिल्या गेलेल्या विशेष संधी वास्तविक परिस्थितीवर आधारलेल्या असल्याने जशा त्या रास्त असल्याचे दिसतातततद्वतच कांहीनी अवास्तव पद्धतीने आपण मागासवर्गीय असल्याचा दावा सांगून राजकीय आरक्षणाच्या संधी लाटल्याचेही निदर्शनास येते. १९१७ च्या ऑगस्ट मध्ये भारतमंत्री माँटेग्यूने हप्त्याहप्त्याने स्वराज्य देण्याची घोषणा केल्यानंतर ब्राम्हणेत्तर या राजकीय चळवळीचा उदय होऊन ती मुंबईसह मध्य, वऱ्हाड या मराठी भाषिक मुलखाबरोबर मद्रास प्रांतात गतिमान झाली.[११] ब्राम्हणेत्तरांच्या चळवळीचे दोन टप्प्यात वर्गीकरण केले जाते. पहिल्या टप्प्यातील आंदोलनाला सांस्कृतीकरणाचीचळवळ म्हणता येईयात एका बाजूस अनेक ब्राम्हणेत्तर जातींनी आम्ही क्षत्रिय किंवा ब्राम्हण आहोत असे सांगून समाजात उच्चवर्णीयांना दिला जाणारा दर्जा आम्हालाही मिळावा अशी आग्रही भूमिका घेतली तर दुसऱ्या

बाजूस त्यांची ही भूमिका ब्राम्हणांनी नाकारली. यातून महाराष्ट्रात अपूर्व आणि प्रचंड असा जातीय अभिनिवेश निर्माण होऊन सांस्कृतीकरणवादी क्षत्रियत्वावर दावा सांगणाऱ्या उच्चभ्रूचा एक ब्राम्हणेत्तर वर्ग आकाराला आला. या वर्गात शहाण्णव कुळात जन्म झाल्याचा अभिमान बाळगणारे मराठे आणि कुणबी जसे होते; तसे जैन, कायस्थ, लेवा पाटीदार शिंपी आणि तेली इत्यादी जातीही होत्या.[१२] दुसऱ्या टप्प्यातील आंदोलनात त्यांनी शिक्षण, आर्थिक विकासच्या संधी आणि राजकीय सत्तेतील वाटा मिळविण्यावर भर दिला.[१३] छत्रपती शाहूंच्या प्रेरणेने आणि भक्कम पाठींब्यानेसत्यशोधक चळवळीचे ब्राम्हणेत्तर चळवळीत झालेले रुपांतर ब्राम्हणेत्तर जमीनदार आणि जहागीरदारांच्या पथ्यावर पडले. त्यांना ब्राम्हणेत्तर पक्षाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. यापूर्वी या ब्राम्हणेत्तर श्रेष्ठींचा सत्यशोधक चळवळीशी दुरान्वये संबंध नव्हता. त्यांनी कधीच सत्यशोधक चळवळीचा 'सर्व प्रकारच्या जन्मजात विषमतेविरुद्धच्या लढ्याचा वारसा स्वीकारला नाही.' स्वत:ला सोयीचा असलेला ब्राम्हणविरोध फक्त तत्परतेने उचलून या चळवळींची लोकप्रियता आणि यंत्रणा आपल्या राजकीय सत्तेच्या पायाभरणीसाठी वापरून आपला स्वार्थ साधला.[१४] शिक्षण, सरकारी नोकऱ्या, कायद्याचे फायदे आणि कसब-हिकमत-आत्मविश्वास यांच्या जोरावर प्रबळ झालेल्या मराठाश्रेष्ठी वर्गाला स्वहितापलिकडे पाहावेसे वाटले नाही. स्त्रीशूद्राबदल त्यांचा दृष्टीकोन ब्राम्हणापेक्षा वेगळा नव्हता . वर्णवर्गश्रेष्ठत्व, सत्तेची मक्तेदारी, जनसामान्यांबद्ल दुरावा-तिरस्कार,अहंकार,दुराभिमान हे दोषही सारखेच होते. आधुनिक काळात टिकवून राहण्यासाठी पण आधुनिक संस्कृतीपासून स्वताचा बचाव करण्यासाठी त्यांनी जातीवादाचा भस्मासुर उभा केला.[१५] मुंबई आणि मद्रास प्रांताच्या सरकारने १९२० नंतर सवर्ण हिंदुतील ब्राम्हणेत्तर जातीपैकी शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जातींचा मागासवर्गीयांमध्ये समावेश केला होता. ब्राम्हणेत्तर पक्षाचे एक नेते भास्करराव जाधव यांनी मराठा-कुणबी जाती गटासाठी स्वतंत्र मतदार संघ द्यावेत आणि ते देणे शक्य नसल्यास मुंबई विधिमंडळातील एकूण ११३ जागांपैकी मराठयांसाठी १०, हिंदूमधील अन्य मागासलेल्या ब्राम्हणेत्तर जातींसाठी १०, लिंगायतांसाठी ४ अस्पृश्यांसाठी ४ आणि जैनासाठी १ अशा राखीव जागांची मागणी केली. इंग्रजांनी मात्र मुंबई विधिमंडळात मराठा आणि तत्सम जातींचा गट तयार करून या गटात मराठा, कुणबी, माळी,कोळी,भंडारी, शिंपी, लोहार, कुंभार, धनगर, भोई, बारी,लोहारी, भावीण,देलोई, शिंदे या जातींना समाविष्ठ केले आणि मराठा आणि तत्सम जातींसाठी ७ आणि नामनिर्देशित पद्धतीने अस्पृश्यांसाठी १ जागा देण्यात आली. त्यामुळे ब्राम्हणेत्तर पक्षाचा अपेक्षा भंग झाला. ब्राम्हणेत्तरातील जैन आणि लिंगायतचा समावेश मागासवर्गीयात न झाल्याने या जातीचे नेत नाराज झाले.[१६] याउलट पारशी मागासलेले नसतानाही त्यांचा मागासवर्गीयात समावेश करण्यात आला होता.अखेर कोण मागासलेले ? आणि कोण पुढारलेले ? याचा निर्णय ब्रिटिश राज्यकर्ते सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून घेत नव्हते तर त्यांच्या साम्राज्याचे रक्षण व हित लक्षात घेऊन आपल्या सोयीनुसार घेत असत. ज्यांना सरकारी नोकऱ्या हव्या असतात ते आपले वजन वापरून आपली गणना मागासवर्गीयांमध्ये केली जावी यासाठी यशस्वी प्रयत्न करतात. असे प्रकार ब्रिटिश राजवटीत होत असत.[१७] या स्थितीमध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात फारसा फरक पडल्याचे जाणवत नाही.

म्हैसूर संस्थांनातील वोक्कलिग आणि लिंगायत या ब्राम्हणेत्तर जातींनी सरकारी नोकऱ्यात आपल्याला वाजवी वाटा मिळावा अशी मागणी संस्थानाच्या राजांकडे केली होती. या मागणीस अनुसरून नियुक्त केलेल्या सर न्यायाधीस लेस्ली मिलर यांच्या अध्याक्षेतेखालील समितीने समाजाचे अ) ब्राम्हण ब) सवर्ण हिंदू , मुस्लिमव भारतीय ख्रिस्ती क) निराश्रित किंवा बहिष्कृत वर्ग अशा तीन गटात विभाजन करून संस्थानातील ५०% जागा मागासवर्गीयासाठी राखीव ठेवाव्यात अशी केलेली शिफारस महाराजांनी स्वीकारली. समितीमधील एम.सी. रंगा अयंगार या सदस्याने गुणवता आणि कार्यक्षमतेची हानी होईल या कारणास्तव आरक्षण धोराणाला विरोध दर्शिवला तर दुसरे सदस्य सी. श्रीकंठेश्वर अय्यर यांनी मागासवर्गीयांपैकी कांही समाज आरक्षणाचे फायदे अन्य मागासवर्गीयांना मिळू न देता आपणच गिळंकृत करतील म्हणून मागास जातींपैकी प्रत्येक जातीसाठी तिच्या संख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात अशी भिन्न सूचना केली.[१८]

तमिळ, मल्याळम आणि तेलगु अशा त्रिभाषिक मद्रास प्रांतात ब्राम्हणेतरांचा पक्ष म्हणून स्थापन झालेल्या 'जस्टिस पार्टीने' ब्राम्हणेतरांसाठी स्वतंत्र मतदार संघ,ते शक्य नसल्यास विधिमंडळात, शिक्षण संस्थेत आणि सरकारी नोकऱ्यात राखीव जागा दिल्या जाव्यात अशी मागणी केली होती.त्यामागे प्रशासनांस प्रातिनिधिक स्वरूप येण्यासाठी ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तरांमधील प्रत्येक जातीचे प्रतिनिधी विधिमंडळात आणि सरकारी सेवेत असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशी त्यांची धारणा होती.

१९१९ च्या कायद्यानुसार १९२० साली घेतल्या गेलेल्या निवडणुकीत मद्रास प्रांताच्या विधिमंडळात जस्टीस पार्टी ८१ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. या पक्षाच्या मंत्र्यानी धरलेल्या आग्रहांमुळे शासन संचालित वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात आणि सरकारच्या सर्व खात्यांत जातनिहाय राखीव जागा ठेवण्याचा शसन आदेश निर्गमित केला गेला. एकुण १२ जागा भरावयाच्या असल्यास ब्राम्हणेत्तर हिंदू ५ जागा (४२%), ब्राम्हण ,मुस्लिम आणि अँगलो-इंडियन यांना प्रत्यकी २ जागा (१७%), आणि निराश्रित किंवा बहिष्कृत जातींसाठी फक्त १ जागा असे जागा वाटणीचे सुत्र स्वीकारण्यात आले होते.या सुत्रानुसार मद्रास प्रांतात १९२१ते १९४७ पर्यंतआरक्षण धोरणाची अंमलबजावणी केली जात होती. [१९] मद्रास प्रांतात ब्राम्हण जातीच्या मक्तेदारीस आव्हान देण्यास आणि जस्टीस पार्टीच्या आरक्षणनीतीचा सर्वाधिक लाभ घेण्यात तमिळ भाषक वेल्लाळ, तेलगु भाषक कम्मा आणि मल्याळम भाषक नायर या जाती आघाडीवर होत्या. [२०]

१९३५च्या कायद्याने अस्पृश्यतेच्या निकषाधारे सर्व अस्पृश्य जातींना अनुसूचित जाती संवर्गात एकत्रित करून (Clubbing) त्यांना अंर्तगत स्पर्धात्मक पद्धतीने आरक्षणाचे लाभ मिळवून देण्याचे ब्रिटिश राजवटीत स्विकारलेले गेलेले धोरणच स्वातंत्र्योत्तर कालखंडातत्यात कोणताही अमुलाग्रह बदल न करता संविधानात त्यासंबंधीच्या तरतुदी करून क्रियान्वित केले गेले. [२१] हे धोरण सकृतदर्शनी कितीही आकर्षक व उपयुक्त वाटत असलेतरी ते सर्व अनुसूचित जातीत आरक्षणाच्या लाभाचे समन्याय पद्धतीने वितरण (Equitable distribution) करण्यास अपयशी ठरले आहे.सजातीय (homogenous)समजून अनुसूचित जाती संवर्गात एकत्रित करण्यात आलेल्या विविध जाती अस्पृश्यतेचा निकष वगळता अन्य बाबतीत भिन्न आणि प्रसंगी परस्पर विरोधी प्रवृत्ती धारण करणाऱ्या व विजातीय (heterogeneous)वैशिष्ट्यांनी ग्रस्त असल्याने त्यांच्यात आरक्षणाचे लाभ घेताना अपेक्षित असलेले सामंजस्य अथवा गृहित एकोपा निर्माण होऊ शकला नाही. या संवर्गातील ज्या जाती तुलनेने अन्य जातीपेक्षा सजग, आक्रमक आणि आर्थिकदृष्ट्या प्रबळ होत्या /आहेत त्यांनाच आरक्षणाचे अधिकांश लाभ घेता आले आहेत. जागृतीचा अभाव, कमकुवत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या जाती मात्र आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिल्या /राहत आहेत. विशिष्ट जाती-जमातीनीच आरक्षणाचा जास्तीत जास्त फायदा घेतल्यामुळे त्यांच्यातील अंतर्गत विषमता वाढली आहे. अतिमागस जाती आजही एकतर आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहील्या आहेत किंवा त्यांना आरक्षणात वाजवी वाटा मिळू शकला नाही. [२२] सजग व आक्रमक जातीतील लाभधारकांच्या तिसऱ्या किंवा चौथ्या पिढी सोबत लाभवंचितांच्या पहिल्या पिढीला स्पर्धा करावी लागत आहे. या स्पर्धेचे स्वरूप प्रबळ विरुद्ध दुर्बल असे बनले आहे. आरक्षणाच्या लाभार्थींचा वर्ग आता परिपक्व झाला आहे, त्यांच्याशी संबंधित नसलेल्या एकाद्या दलिताला त्याच्या कळपात येण्याची शक्यता आता अगदी नगण्य झाली आहे. शिक्षण आणि आरक्षणाचे लाभ उचलण्याच्या दृष्टीने दुसऱ्या पिढीतील दलित हे आरक्षणाच्या जास्तीत जास्त फायद्यावर मक्तेदारी गाजवत आहेत [२३] बहुतेक सर्व घटक राज्यात अनुसूचित जाती-जमाती संवर्गातंर्गत असे चित्र उभे राहिले आहे. यावरील उपाय म्हणून आरक्षणाच्या लाभाचे समन्याय पद्धतीने वितरण (Equitable distribution) होण्यासाठी आरक्षणातंर्गत आरक्षणाची म्हणजेच अनुसूचित जाती-जमाती संवर्गातंर्गत वर्गीकरणाची मागणी जी पूर्वी दबक्या आवाजात केली जात होती ती आता जोरकसपणे पुढे आली आहे. ही मागणी कशी असंविधानिक म्हणजेच संविधानाचे उल्लंघन(Violation of Constitution) करणारी, दलित हितसंबंधास व ऐक्यास बाधा आणणारी आणि अनुसूचित जाती-जमातीच्या एकजिनसीत्वावर (homogenous) आघात करणारी ठरते. असे अनेक आक्षेप आरक्षणाचे अधिकांश लाभ घेत असलेल्या जाती व त्या जातीतील अभ्यासक व धुरीण वर्गाकडून घेतले जातात. हा धुरीण व अभ्यासकांचा वर्ग या देशात आरक्षणनीतीचा उगम फुले-शाहू-आंबेडकरांच्या ज्या तत्व–विचारातून झाला त्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करताना आढळतो.

अनुसूचित जाती- जमातींच्या राज्यनिहाय याद्यांमध्ये फेरबदल किंवा दुरुस्त्या करण्याचा अधिकार केंद्र सरकारला असतो. जून १९६५ मध्ये तत्कालीन कायदा सचिव बी.एन. लोकूर यांच्या अध्यक्षेतेखाली एक समिति नेमली गेली. या समितीने राज्यघटनेने अस्पृश्यता पाळणे शिक्षापात्र गुन्हा ठरविल्याने अस्पृश्यतेची तीव्रता जलदगतीने विशेषत: शहरी भागात(Cities and Town)नष्ट होऊ लागली आहे, उच्च आणि कनिष्ठ जातीतील सीमारेषा( Line of Demarcation) तुलनेने पुसट होत आहे,आरक्षणाच्या सवलतींचा अधिकांश लाभ (Lion's Share)लोकसंखेने सर्वाधिक आणि राजकीयदृष्ट्या जागृत व संघटीत असलेल्या जातीच घेत आहेत.अशा स्थितीत तुलेनेने प्रगत आणि असलेल्या जातींना वगळण्याची वेळ आली आहे. असे निरीक्षण नोंदवून अनुसूचित जातीतील २८ आणि अनुसूचित जमातींच्या १४जातींना अनुसूचित जाती- जमातींच्या राज्यनिहाय याद्यांमधून वगळण्याची

शिफारस केली. वास्तविकता आरक्षणाच्या सवलतींचा प्रबळ जातींना सर्वाधिक लाभ होण्यास किंवा लाभापासून दुर्बल जाती वंचित राहण्यास आरक्षण वितरणाची सदोष पद्धती कारणीभूत होती.आरक्षण वितरणाच्या या सदोषपद्धतीत सुधारणा सुचविण्याऐवजी लोकूर समितीने कांही जातींना अनुसूचित जाती- जमातींच्या याद्यांमधून वगळण्याची केलेली शिफारस रोगा पेक्षा विलाजभयंकर अशा स्वरुपाची होती. त्यामुळे वंचित आणि दुर्बल जातींना आरक्षणाचा न्यायवाटा मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक तरतुदी १९७६ च्याअनुसूचित जाती- जमाती संशोधन अधिनियमात होऊ शकल्या नाहीत. त्यामळे संसदेत असलेल्या बळाच्या आधारे प्रबळ व संघटीत असलेले अनुसूचित जाती- जमातीचे संसदेतील प्रतिनिधी लोकूर समितीच्या शिफारशी हाणून पाडण्यात यशस्वी झाले.[२४]

अनुसूचित जाती संवर्गात संवर्गातंर्गत वर्गीकरण करूनआरक्षण धोरणाचा लाभ वंचित जातींना प्राधान्यक्रमाने मिळवून देणारे राज्य म्हणजे पंजाब होय. लोकसंख्येने सर्वाधिक असलेल्या बाल्मिकी आणि मजहबी शीख या जाती अधी-धर्मी आणि चमार (राविदासी आणि रामदासी शीख) जातींच्या तुलनेत आरक्षणाच्या सोयी सवलतींचा लाभ घेण्याच्या स्पर्धेतमागे पडल्या. चमार आणि बाल्मिकी या जातीतील ज्यांनी शीख धर्मात धर्मांतर केले त्यांची ओळख अनुक्रमे रामदासी शीख आणि मजहबी शीख अशी प्रस्थापित झाली. बाल्मिकी आणि मजहबी शीख यांची लाभ वंचितता आणि तिच्या एकगठ्ठा मतांचे निवडणूक राजकारणात असलेले महत्व लक्षात घेऊन मुख्यमंत्री ज्ञानी झैलसिंग यांनी ५ मे १९७५ रोजी अनुसूचित जातीतंर्गत वर्गीकरणाचा शासन निर्णय निर्गमित केला. [२५] अनुसुचीत जातीच्या एकुण आरक्षणापैकी ५० टक्के म्हणजेच २५ टक्के आरक्षणापैकी १२.५ टक्के आरक्षण बाल्मिकी आणि मजहबी शीख या जातींना देण्यात आले. [२६] मुळातच स्वत: वंचित जातीतून आलेल्या आणि मुख्यमंत्री पदाचीसंधी मिळालेल्या ज्ञानी झैलसिंग सरकारचा हा निर्णय दलितांमधील लाभधारक जातींमध्ये अप्रिय ठरला असलातरी तो आरक्षणाच्या लाभाचे न्याय वितरण व्हावे यासाठी संघर्ष करणाऱ्या जातींना उस्फुर्ती देणारा ठरला. १ नोहे. १९६६ मध्ये भाषिक आधारावर स्थापन झालेल्या हरियानामध्ये आरक्षणाच्या सोयी सवलतींचा (१९९४)आंध्रप्रदेश (२०००) पासून संबधित राज्यांनी निर्गमित केलल्या कायद्यानुसार निर्माण केले गेले; परंतु राज्यांना असा कायदा करण्याचा अधिकार नाही या सबबीखाली सर्वोच्च न्यायालयाने २००४ मध्ये इ.व्ही.चिन्नॉय[२७] (E.V. Chinnaiah) विरुद्ध आंध्रप्रदेश या खटल्यात दिलेल्या निर्णयामुळे अनुसूचित जातीसंवर्गातंर्गत केले गेलेले वर्गीकरण रद्द झाले आहे.[२८] सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतरही तामिळनाडूने २००९ मध्ये अनुसूचित जातीसंवर्गातंर्गत वर्गीकरणाचा कायदा करून अरुणथाथियर (Arunthathiyar) या जाती गटास ३%आरक्षण दिले आहे.[२९]

अनुसूचित जाती संवर्गात आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहणाऱ्या जातींचा शोध घेऊन अनुसूचित जातीतंर्गत असलेल्या भेदभावाचे उच्चाटन आणि आरक्षणाच्या लाभाचे समन्याय वितरण या विषयी उपाय सुचविण्यासाठी घेण्यासाठी कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यात अनुक्रमे निवृत्त न्यायमूर्ती ए.जे. आणि क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग असे आयोग नेमले गेले. या दोनीही आयोगांनी आरक्षण लाभाचे समन्याय वितरण होण्यासाठी अनुसूचित जातीतंर्गत वर्गीकरणाची शिफारस केली आहे.

केंद्र सरकारने अनुसूचित जातीसंवर्गातंर्गत वर्गीकरणाच्या प्रश्नाचा सखोल वेध घेऊन शिफारशी सुचविण्यासाठीनेमलेल्या न्या. उषा मेहरा आयोगाने आपला अहवाल मे २००८ मध्ये केंद्र सरकारला सादर केला.या आयोगाने "राज्यविधिमंडळांने केलेल्या शिफारशीन्वये संसदेने संविधानाच्या अनुच्छेद ३४१ मध्ये दुरुस्ती करून असे सूक्ष्म वर्गीकरण अनुसूचित जाती-जमाती संवर्गातंर्गत करावे" अशी शिफारस केली आहे.[३०] मात्र निवडणुकीच्या राजकारणावर डोळा असणाऱ्या सर्वच राजकीय पक्ष आरक्षण वंचितांच्या या मागणीकडे सोयीनुसार भूमिका घेऊन वंचित जातींना झुंजवत ठेवण्याचे धोरण स्वीकारताना दिसत आहेत. सत्तेत नसताना या प्रश्नावर अनुकूल भूमिका घेणाऱ्या भाजपला सत्तारूढ झाल्यानंतर अनुसूचित जाती-जमाती संवर्गातील प्रबळ जातींच्या संसदेतील प्रतिनिधीच्या दबावामुळे आणि निवडणुकीतील जाती समीकरणाच्या नीतीमुळे सकरात्मक कृती करता येऊ शकलेली नाही.

**संदर्भ –**

१. य.दि.फडके,खरी ही न्यायाची रिती, मौज प्रकाशन गृह ,मुंबई , जानेवारी -२००४, प्रस्तावना-पृष्ठ -१६.

२. भा.ल.भोळे, भारतीय शेतकरी कामगार पक्ष : जडणघडण आणि वाटचाल, पहिली आवृत्ती, नोव्हे.२०१०, लोकवाङमय गृह, मुंबई,पृष्ठ-२

 ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

३. कित्ता पृष्ठ -३ आणि य.दि.फडके,पूर्वोक्त प्रस्तावना पृष्ठ-१७

४. य.दि. फडके ,महात्मा फुले समग्र वाङमय, सुधारित,सहावीआवृत्ती, नोव्हे.२००६,महाराष्ट्र राज्य साहित्य आणिसंस्कृती मंडळ , मुंबई - पृष्ठ – ८१.

५. कित्ता-पृष्ठ -१९९.

६. कित्ता पृष्ठ -६१८.

७. य.दि.फडके,पूर्वोक्त पृष्ठ -५.

८. Dr.Babasaheb Ambedkar, Writings& Speeches Vol.1-page-257.

९. Dr.Babasaheb Ambedkar, कित्ता पृष्ठ -401.

१०. आनंद तेलतुंबडे, साम्राज्यवाद विरोध आणि जातीविनाश, सुगावा प्रकाशन, पुणे , नोव्हे.२००७ पृष्ठ -३२.

११. य.दि.फडके,पूर्वोक्त पृष्ठ -१५ .

१२. के.के.चौधरी, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ,आवृत्ती पहिली,२०१५ पृष्ठ -९३ ते ९९.

१३. य.दि.फडके, राखीव जागांची शंभर वर्ष ,सुगावा प्रकाशन,पुणे,एप्रील २००६ पृष्ठ - ११

१४. भा.ल.भोळे पूर्वोक्त पृष्ठ -४

१५. कित्तापृष्ठ -५

१६. य.दि.फडके, खरी ही न्यायाची रीती,पृष्ठ -१८

१७. कित्ता पृष्ठ १६

१८. Modern MysoreGazetteer1868, chapter-XXXVI, Page, 305 and Pai PanandikarV. A .(Ed.) The Politics of Backwardness: Reservation Policy in India, New Delhi,Konark PublicatinPvt.Ltd.1997,Page-126,127

१९. य.दि.फडके, खरी ही न्यायाची रीती,पृष्ठ -१०

२०. किता पृष्ठ -११

२१. प्रकाशबाळ / किशोर बेडकिहाळ,संपादक, भरतीय राजकीय व्यवस्था ,सतीश कामत. राज्यघटनेतील सामाजिक ध्येयवाद आणि राखीव जागा, आंबेडकर अकादमी,सातारा, पहिली आवृत्ती, २००२,पृष्ठ - २४५

२२. य.दि.फडके, खरी ही न्यायाची रीती,पृष्ठ -१९८

२३. आनंद तेलतुंबडे,पूर्वोक्त पृष्ठ -३१

२४. Marc Galkanter-1984-Competing Equalities: Law and The Bacward Classes in India,Oxford University Press, New Delhi ,1984 ,Page-137

२५. Surinder S Jodhka, Avinash Kumar, Internal Classification of Scheduled Castes: The PunjabStory,EPW, Vol. 42, Issue No. 43, 27 Oct, 2007

२६. Secretary to Govt. of Punjab, Letter No.1818-SWI-75/10451 Dated.5th May,1975

२७. Edt,Yagati Chinna Rao-Dividing dalit-Appendices-page 290-370

२८. किता पृष्ठ -290-370

२९. Tamiladu govt. Order G.O.Ms.no.55 Dated: 08.04.2010

३०. Edt,Yagati Chinna Rao-Dividing dalit-page 361

❑❑❑

Copyright © 2020 Authors 

 ISSN : 2249-6661
Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# पारदर्शक निवडणूक आयोग : लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ

डॉ. इंद्रजीत जाधव, प्राचार्य, बी.डी. काळे
महाविद्यालय, घोडेगाव ता. आंबेगाव जि.पुणे

प्रास्ताविक :-

स्वतंत्र व नि:पक्ष वातावरणात निवडणुका पार पडणे हे एका अर्थाने लोकशाहीचे संवर्धन करणे होय. ज्या देशातील नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेसंबंधी कोणतीही संदिग्ध भावना मनामध्ये नसते तेंव्हा लोकांचा शासन व्यवस्थेवरील विश्वास वृद्धिंगत होतो. त्याच बरोबर राष्ट्रवादी भावना प्रबळ बनतात. अर्थातच लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक, नि:पक्ष व खुल्या वातावरणात पार पडणे हे त्या व्यवस्थेला बळकटी प्राप्त करून देते . कलम ३२४ नुसार स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. प्रजासत्ताक भारताने प्रातिनिधिक शासन व्यवस्थेचा स्वीकार केला असला; तरी या प्रक्रियेसंदर्भातप्रतिनिधी निवड ही पारदर्शक असली पाहिजे. ब्रिटीश शासन व्यवस्थेने ज्या पद्धतीने या प्रणालीचा स्वीकार केला व अंमलबजावणीची पद्धत ठरवली त्याच पद्धतीने आपण राबवली पाहिजे. राजकीय अभ्यासक पोलॉक असे म्हणतो की, "सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडल्या नाहीत; तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते"

अलीकडील काळात लोकांमध्ये एक संदिग्धतेची भावना निर्माण होताना दिसते. निवडणूक आयोगाला काळानुसार बदलणे अपरिहार्य आहे. लोकांनी देखील आपल्यामनात कोणताही प्रश्न न निर्माण करता हा बदल स्वीकारला पाहिजे. निवडणूक आयोग अधिक पारदर्शक होणे व लोकशाही शासन व्यवस्थेस अधिक बळकटी प्राप्त करून देणे महत्वाचे आहे. निवणूकप्रक्रियेबद्दल लोक साशंक असतील; तर लोकशाही व्यवस्थेलाच सुरुंग लागू शकतो. त्यामुळे निवडणूक आयोगाचे कार्य व अधिकारा संबंधी राजकीय पक्षांनी हस्तक्षेप करता कामा नये. असे झालेच तर निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा प्रश्न निर्माण होतो आणि आयोगाची स्वायत्तता जर एखाद्या राजकीय पक्षाच्या हाती आली; तर त्यातून निर्माण होणारे प्रश्न हे नव्या व्यवस्थेला जन्म देणारे असतील.जी व्यवस्था लोकशाहीशी फारकत घेईल त्यामुळे संविधानाच्या मूळ संरचनेलाच तडा जाईल. अर्थातच लोकशाही शासन व्यवस्था टिकवणे, वाढवणे तिचे संवर्धन करण्यासाठी नि:पक्ष, स्वतंत्र, पारदर्शक आणि खुल्या वातावरणात निवडणूक आयोगास काम करता आले पाहिजे.तर निश्चितच निवडणूक आयोग हा लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ ठरेल. जर आधारस्तंभकोलमडला तर शासन व्यवस्था कोलमडण्यास वेळ लागणार नाही. प्रस्तुत शोध निबंधात निवडणूक आयोगाची स्वायत्तता टिकवण्यासाठी करण्यात आलेल्या संविधानातील दुरुस्त्या, निवडणूक आयोगासमोरील आव्हाने आणि उपाय योजना आदी संदर्भात विश्लेषण करण्यात आले आहे.

II

निवडणूक आयोगा समोर काळनुरूप अनेक प्रश्न निर्माण झाले या प्रश्नांना सोडवण्यासाठी निवडणूक आयोगाने वेळोवेळी सुधारणा घडवून आणल्या.त्या सुधारणांचा संक्षिप्त आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. साधारणतः १९७० पर्यंत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीत फारसा बदल झालेला दिसत नाही. पण नंतर बदलत्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा विचार करता अनेक बदल झाल्याचे दिसून येतात. १९७० नंतर आयोगाने निवडणूक सुधारणांचा प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठवला अर्थातच लोकप्रतिनिधी कायदा १९५० व १९५१ मध्ये काही दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आणि डिसेंबर १९७३ ला लोकसभेत मांडण्यात आल्या. परंतु जानेवारी १९७७ साली सभागृह बरखास्त झाल्यामुळे हे विधेयक रद्द झाले आणि पुढील काळात या विधेयकास वेगळेच वळण मिळाले. जयप्रकाश नारायण यांनी १९७४ साली सभागृहात 'पीपल्स यूनियन फॉर सिविललिबरटीज'या संघटनेचे अध्यक्ष माजी न्या.तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती त्या समितीनेही काही शिफारशी सुचवल्या. १९७२ मध्ये एस.पी.सेन,१९७७ - एस.एल.शकधर, १९८२ आर.के.त्रिवेदी, १९९० - दिनेश गोस्वामी, १९९२ - टी.एन.शेषन, २००४- टी.एस.कृष्णमुर्तीआदी समित्यांची स्थापना करून निवडणूक आयोगाने वेळोवेळी सुधारणा केल्या व निवडणूक आयोगाची कार्य अधिक पारदर्शक आणि विश्वासहार्य कसे बनतील याकडे लक्ष दिले.

Copyright © 2020 Authors 